23 APR 2017 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सामान्य कुटुंबांतील विद्यार्थिनी : नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीचे यश

# मानसी हुपरीकर, नीलम यादव यांना परदेशात शिक्षणाची संधी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीमधील मानसी हुपरीकर या विद्यार्थिनीला परदेशात संशोधन करण्याची, तर नीलम यादव या विद्यार्थिनीला उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे. या विद्यार्थिनी सर्वसामान्य कुटुंबांतील आहेत.

विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सन २०१२ मध्ये 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स'ची सुरुवात झाली. यात बी. एस्सी., एम. एस्सी. एकात्मिक अभ्यासक्रम सुरू झाला. या अभ्यासक्रमाच्या पहिल्या बॅचची मानसी ही सध्या एम.एस्सी. भाग-२ मध्ये शिकते आहे. तिला मारबर्ग (जर्मनी) येथील फिलिप्स विद्यापीठात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक प्रा. डॉ. वोल्फगँग पारक यांच्याकडे इंटर्नशिप करण्याची संधी प्राप्त झाली आहे. तिचे वडील प्रमोद हुपरीकर हे इचलकरंजीच्या शाहू हायस्कूलचे मुख्याध्यापक आहेत; तर आई गृहिणी आहे.

## प्रेरणादायी यश


मानसी हुपरीकर


नीलम यादव

सर्वसामान्य कुटुंबातील मानसी हुपरीकर आणि नीलम यादव यांनी मिळविलेले यश हे अन्य विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. नीलम हिने आई-वडिलांच्या कष्टाचे चीज केले आहे. मानसीला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या संशोधकांसमवेत संशोधन करण्याची संधी मिळते आहे, हे अभिमानास्पद आहे. या दोन्ही विद्यार्थिनींच्या माध्यमातून 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स'ने भरीव यश मिळविले आहे, अशी प्रतिक्रिया डॉ. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केली.

सध्या बी. एस्सी. भाग-३ मध्ये शिकत असलेल्या नीलम यादवला हिलस फ्रान्समधील पॅरिस-सूड विद्यापीठात पुढील पदव्युत्तर शिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे. त्यासाठी तिला इरॅस्मस मुंडस ही सुमारे ३० लाख ६६ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळाली आहे. नीलम ही मूळची उत्तर प्रदेशातील असून, तिचे वडील घनश्याम यादव हे पेंटर कॉन्ट्रॅक्टर आहेत. व्यवसायानिमित्त हे कुटुंब कोल्हापुरात स्थायिक झाले आहे.

या विद्यार्थिनींना 'स्कूल ऑफ नॅनो सायन्स' अधिविभागाचे समन्वयक डॉ. पी. एस. पाटील, के. के. शर्मा, शिवदत्त प्रभू यांचे मार्गदर्शन लाभले. या विद्यार्थिनींचा सत्कार कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी डॉ. पी. एस. पाटील, आंतरविद्याशाखीय विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 3 APR 2017
लोकमत

# 'समावेशी शिक्षण' केंद्राचे शिवाजी विद्यापीठात उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालयात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्राचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांच्या हस्ते सोमवारी झाले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह खासदार धनंजय महाडिक यावेळी प्रमुख उपस्थित होते. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत (रुसा) हे केंद्र साकारण्यात आले आहे.

केंद्र समन्वयक डॉ. नमिता खोत यांनी सांगितले की, दिव्यांग विद्यार्थ्यांना अव्यंग विद्यार्थ्यांच्या बरोबरीने शिक्षणाच्या संधी उपलब्ध कराव्यात. त्यांना आवश्यक साधन-सुविधा तसेच अभ्यासपूरक पर्यावरण उपलब्ध करून द्याव्यात, हा हेतू या केंद्राच्या उभारणीमागे आहे. येथे अंध, मूकबधिर, अस्थिव्यंगबाधित, गतिमंद विद्यार्थ्यांसाठी अध्ययन साधने उपलब्ध केली आहेत.

कार्यक्रमास 'रुसा'च्या राज्य प्रकल्प संचालक मीता राजीवलोचन, सहसंचालक शरद पाटील, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ महाराज विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जी. एन. शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विद्यापीठाच्या रुसा केंद्राच्या समन्वयक डॉ. अकल्पिता अरविंदेकर, नांदेड विद्यापीठाचे प्रधान अन्वेषक डॉ. शैलेश वढार, औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे डॉ. प्रवीण यन्नावार, आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

2 3 APR 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने व्याख्यान

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने २६ एप्रिल रोजी अमर हबीब यांचे व्याख्यान होणार आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा शेतीविषयक विचार आणि सद्य:स्थिती या विषयावर हे व्याख्यान दुपारी बारा वाजता वि. स. खांडेकर भाषा भवन येथे होणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत.